Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.

Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# पुणे विद्यापीठ

फोन नं. : २५६०११४७

बहि:शाल शिक्षण मंडळ
पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७

मानद संचालक : प्रा. तेज निवळीकर

संदर्भ : बशिमं/ ३९१ /२०११.
दिनांक : २७.१२.२०११

प्रति,
मा.विभागप्रमुख (शैक्षणिक व प्रशासकीय विभाग),
पुणे विद्यापीठ,
पुणे–४११ ००७.

**विषय : विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा–यांसाठी निबंधलेखन व चर्चापरिसंवाद संघ स्पर्धा आयोजित करणेबाबत....**

महोदय,

विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा–यांमध्ये असणा–या कलागुणास वाव मिळावा म्हणुन बहि:शाल शिक्षण मंडळामार्फत शिक्षकेतर कर्मचा–यांसाठी निबंधलेखन व चर्चापरिसंवाद संघ स्पर्धा आयोजित केलेली आहे. स्पर्धकाला दोन्ही स्पर्धेत भाग घेता येईल.

- <u>निबंधलेखन स्पर्धा</u> : विषय
  १. माझ्या कल्पनेतील लोकपाल.
  २. नोकरी आणि घर : माझी कसरत.
  (शब्द मर्यादा : १००० ते १२०० शब्द)

- <u>चर्चापरिसंवाद संघ स्पर्धा</u> : सदर स्पर्धेसाठी एक दिवस आधी विषय देण्यात येईल. (वेळ १२ मिनीटे)

## –: स्पर्धेचे नियम व अटी :–

१. निबंधलेखन व चर्चापरिसंवाद संघ स्पर्धेसाठी नावे <u>दिनांक २८ जानेवारी, २०१२</u> पर्यत या विभागास विभाग प्रमुख यांच्यामार्फतच पाठवावीत.

२. चर्चापरिसंवाद संघ स्पर्धकांनी स्पर्धेसाठी एकूण ३ स्पर्धक, पैकी १ संघनायक असा संघ तयार करुन संयोजकांकडे लेखी स्वरुपात विहित नमुन्यात माहिती भरुन <u>दिनांक २८ जानेवारी, २०१२</u> पर्यत देणे आवश्यक आहे. (विहित नमुना या कार्यालयात उपलब्ध आहे.)

Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features



३. निबंधलेखनासाठी दोन विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर स्पर्धकांस प्रत्यक्ष लेखन दिनांक ३१ जानेवारी, २०१२ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत 'सेट सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे' या ठिकाणी करावे लागेल. निबंधलेखनासाठी आवश्यक कोरे पेपर या विभागाकडून देण्यात येईल.

४. चर्चापरिसंवाद संघ स्पर्धा दिनांक ३ फेब्रुवारी, २०१२ रोजी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत विद्यापीठाच्या 'सेट सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे–७' या ठिकाणी आयोजित करण्यात येईल. दिनांक २ फेब्रुवारी, २०१२ रोजी सांयकाळी ४.०० ते ५.०० या वेळेत चर्चापरिसंवाद संघ स्पर्धेचे विषय सोडत पध्दतीने जाहीर करण्यात येईल. यावेळी संघप्रमुखांनी 'बहि:शाल शिक्षण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे–७' या ठिकाणी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

५. सदरील निबंध स्पर्धेत कमीत कमी १० स्पर्धकांनी व चर्चापरिसंवाद संघ स्पर्धेसाठी कमीत कमी १० संघानी भाग घेतला पाहीजे तरच स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.

६. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

**—: बक्षीस :—**

| क्र. | बक्षीस क्रमांक | निबंधलेखन | चर्चापरिसंवाद संघ स्पर्धा |
|---|---|---|---|
| १ | पहिले | रुपये २०००/— | रुपये ३०००/— |
| २ | दुसरे | रुपये १५००/— | रुपये २५००/— |
| ३ | तिसरे | रुपये १२००/— | रुपये २०००/— |
| ४ | उत्तेजनार्थ | रुपये १०००/— | रुपये १५००/— |

विजयी स्पर्धकांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त बक्षीसे दिली जातील. स्पर्धकांनी निबंधलेखन व चर्चापरिसंवाद संघ नावे विभागप्रमुखांमार्फत मानद संचालक, बहि:शाल शिक्षण मंडळ यांचेकडे पाठवावीत आणि अधिक तपशिलासाठी त्यांचेशी संपर्क साधावा.

कळावे,

आपला,

(प्रा. तेज निवळीकर)
मानद संचालक
बहि:शाल शिक्षण मंडळ
पुणे विद्यापीठ, पुणे-७.

टीप : सर्व विभागप्रमुखांना विनंती की, सदरचे परिपत्रक त्यांनी शिक्षकेतर कर्मचा–यांच्या निदर्शनास आणावे.